# जनजागृती स्पर्धा

### महत्वाचे मुद्दे व सादरीकरणाबाबत इतर माहिती

- ही स्पर्धा महापालिका स्तरावर असेल.
- ही स्पर्धा ठाणे शहरातील सर्वांकरिता खुली असून या स्पर्धेत कुणीही नागरिक किंवा संस्था सहभागी होऊ शकतात. (वैयक्तीक किंवा सांघिक सहभागाकरिता स्वतंत्र गट राखण्यात आलेले नाहीत.)
- जनजागृती स्पर्धेतर्गत एकूण ०३ स्पर्धांचे उपप्रकार आहेत – माहितीपट स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा, माझी वसुंधरा अभियानाचा प्रसार. या कोणत्याही एका उपप्रकारात किंवा सर्व उपप्रकारात स्पर्धकांना सहभागी होता येईल. परंतु, प्रत्येक उपप्रकारात सहभागाकरिता स्वतंत्र नोंदणी (Registration) आवश्यक आहे.
- पथनाट्य व माझी वसुंधरा अभियानाचा प्रसारांतर्गत बनविण्यात आलेल्या प्रतिकृतीची तज्ञ समितीद्वारे प्रत्यक्षपणे पाहणी करुन गुणांकण करण्यात येईल.
- या तीनही स्पर्धा उपप्रकारांतर्गत स्वतंत्रपणे ०३ पारितोषीके (प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक व तृतीय क्रमांक) वितरीत होतील. त्यानुसार जनजागृती स्पर्धेअंतर्गत एकूण ९ पारितोषीके वितरित करण्यात येतील.
- सर्व पारितोषीके धनादेश किंवा ECS माध्यमातून वितरीत होणार असून पारितोषीक रक्कम विजेत्यांच्या बँक खात्यावर जमा होईल.
- पारितोषीकाचे संक्षिप्त वेळापत्रक खालीलप्रमाणे,

| | **पोर्टलवर सादर करण्याची अंतिम तारीख** | **अधिकतम लाईक्सकरिता समाज माध्यमांवर सादर करण्याची तारीख** | **ठामपाच्या फेसबुक पृष्ठावरील (#Pollutioncontrolcellthane) लाईक्सची गणना दिनांक** |
|---|---|---|---|
| **माहिती पट** (documentary) | ३१ जानेवारी, २०२४ | ३१ जानेवारी, २०२४ नंतर कधीही | ०१ मार्च, २०२४ दुपारी १२:०० वा. पर्यंत |
| **पथनाट्य** (Street Play) | ३१ जानेवारी, २०२४ | ३१ जानेवारी, २०२४ नंतर कधीही | ०१ मार्च, २०२४ दुपारी १२:०० वा. पर्यंत |
| **माझी वसुंधरा अभियानाचा प्रसार** (promulgation of Majhi Vasundhara) | ३१ जानेवारी, २०२४ | ३१ जानेवारी, २०२४ नंतर कधीही | ०१ मार्च, २०२४ दुपारी १२:०० वा. पर्यंत |

- सादरीकरणाबाबत काही सूचना,

| | **सादरीकरणाचा कालावधी** | **समाज माध्यमावर सादरीकरणाची गुणवत्ता** | **प्रत्यक्ष सादरीकरणाची वेळ** |
|---|---|---|---|
| **माहिती पट** (documentary) | किमान ०५:०० मिनिटे ते कमाल १०:०० मिनिटे | चित्रफीत व ध्वनी स्पष्ट असणे आवश्यक आहे. | लागू नाही |
| **पथनाट्य** (Street Play) | किमान ०७:०० मिनिटे ते कमाल १५:०० मिनिटे | चित्रफीत व ध्वनी स्पष्ट असणे आवश्यक आहे. | १ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत महापालिकेने दिलेल्यावेळी तज्ञ समितीद्वारे सादरीकरण पाहणी होईल. |
| **माझी वसुंधरा अभियानाचा प्रसार** (promulgation of Majhi Vasundhara) | **प्रतिकृतीचा आकार** किमान ४ फुट X ४ फुट (किंवा सार्वजनिक ठिकाणांवर सहजतेने दर्शविता येईल इतका.) | प्रतिकृतीची सर्व बाजूंनी छायाचित्रे सादर करणे आवश्यक असून सदर छायाचित्रे स्पष्ट असावी. | १ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत महापालिकेने दिलेल्यावेळी तज्ञ समितीद्वारे सादरीकरण पाहणी होईल. |

- या स्पर्धेंतर्गत सादर करण्यात आलेली माझी वसुंधरा अभियान प्रसार प्रतिकृती ठाणे महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल, किंवा आपल्या संस्था/आस्थापनेत दर्शनी भागात उभारावी लागेल. प्रतिकृती बनविण्याकरिता कुठलाही खर्च महापालिका अदा करणार नाही.
- माहितीपट, पथनाट्य अथवा माझी वसुंधरा अभियानाचा प्रसाराकरिता तयार करण्यात येणारी प्रतिकृती या पर्यावरण संवर्धन विषयाशी निगडीत असाव्यात. यातून पर्यावरण संरक्षण व संवर्धनाविषयी सामाजिक संदेश देण्यात यावेत.
- स्पर्धेत सहभागाकरिता सादर करण्यात येणारे व्हिडीओ, फोटो अथवा इतर समाजमाध्यमांवर सादर करण्यात येणारी माहिती ही सामाजिक भावना दुखावणारी नसावी. अश्या स्वरुपाची कुठलीही बाब निदर्शनास आल्यास संबंधित स्पर्धकाला स्पर्धेतून बाद करण्याचा अधिकार ठाणे महानगरपालिका राखून ठेवत आहे.